**“नोव्हेंबर २०१८” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक १ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ च्या कामकाजासाठी सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवर कार्यासन-३३ (निवडणूक) करिता मंत्रालयीन संवर्गातील २२ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत.
- दिनांक २ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय मुख्य इमारतीतील उपागृहामध्ये कर्मचारी भोजन कक्षासाठी स्टेनलेस स्टीलचे टेबल व खुर्च्या तसेच अधिकारी कक्षासाठी सागवानी लाकडाच्या टेबत व खुर्च्या तसेच इतर फर्निचर खरेदी करण्यासाठी रु.५१,४८,२३५/- (रुपये एकावन्न लक्ष अठ्ठेचाळीस हजार दोनशे पस्तीस फक्त) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ५ नोव्हेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील ५८ पदावर निवडीव्दारे नियुक्ती देण्यासाठी दिनांक १९ जानेवारी २०१९ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत “सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१८” फक्त मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.
- दिनांक ५ नोव्हेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय उपाहारगृह व विधानभवन उपाहारगृहामार्फत २०० मिलिपेक्षा जास्त द्रव धारण क्षमता पिण्याच्या पाण्याच्या सिलबंद बॉटल्स, त्या त्या संबंधित कार्यालयाने नष्ट करण्याच्या अटीच्या अधीन राहून उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ५ नोव्हेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालल चारही आहार / उपाहारगृहांच्या कार्यन्वियतेसाठी लागणारे सिलबंद पिण्याच्या पाण्याच्या बॉटल्स मे.मुकेश ट्रेडींग कंपनी या स्वीकृत पुरवठादाराकडून दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ ते २ नोव्हेंबर २०१९ कालावधीसाठी स्वीकृत दरानुसार खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ च्या शासन ज्ञापनान्वये लघुटंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या मराठी ११ व इंग्रजी १३ अशा एकूण २३ उमेदवारांचे नियतवाटप करण्यात आले आहे.
- दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ च्या शासन ज्ञापनान्वये निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या मराठी २२ व इंग्रजी १९ अशा एकूण ४१ उमेदवारांचे नियतवाटप करण्यात आले आहे.
- दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ च्या शासन ज्ञापनान्वये उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या मराठी १३ व इंग्रजी १० अशा एकूण २३ उमेदवारांचे नियतवाटप करण्यात आले आहे.
- दिनांक २९ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिनस्त (१) उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ तसेच आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त (२) उपसंचालक / प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) (श्रेणी-१) / उपायुक्त, गट-अ, (३) प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) (श्रेणी-२) / सहायक आयुक्त, गट-अ, (४) सहायक प्रकल्प अधिकारी / सांख्यिकी अधिकारी / प्रशासकीय अधिकारी / संशोधन अधिकारी / गृहप्रमुख / प्रबंधक, गट-ब या नवीन संवर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

**(ख) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील ८ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- अवर सचिव-६, सहायक कक्ष अधिकारी-३, वरिष्ठ स्वीय सहायक-१, निवडश्रेणी लघुलेखक-१, उच्चश्रेणी लघुलेखक-१, निम्नश्रेणी लघुलेखक-१, लिपिक-टंकलेखक-३ अशा १६ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याची बदली रद्द करण्यात आली आहे.
- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याच्या सेवा अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

**<u>(ग) पदोन्नती / प्रपत्र बढती व मुदतवाढ / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>**

- १३ कक्ष अधिकाऱ्यांना अवर सचिव पदी पदोन्नती देण्यात आली आहे.
- अवर सचिव १, कक्ष अधिकारी-१ अशा २ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१, लिपिक-टंकलेखक-१ अशा ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- उपसचिव-१, कक्ष अधिकारी-२, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ४ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले.
- उपसचिव-१, अवर सचिव-१, उच्चश्रेणी लघुलेकखक-१ अशा ३ अधिकारी / कर्मऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) <u>प्रशिक्षण / परीक्षा</u>**

- दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ च्या शासन पत्रान्वये सन २०१८-१९ या वर्षासाठी अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना सेवांतर्गत एका आठवडयाचे प्रशिक्षण आयोजित केले आहे.
- दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोतत्तर प्रशिक्षण परीक्षेच्या निकालातील ३ उमेदवारांच्या गुणांची फेरमोजणी करण्यात आली आहे.
- दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालयामधील सहायक कक्ष अधिकाऱ्यांच्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा २०१८ ही दिनांक १३ ते १५ डिसेंबर २०१८ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा परीक्षा कक्ष, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

**(छ) <u>ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१६ व १ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीतील तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याचा, कक्ष अधिकाऱ्यांच्या ज्येष्ठतासूचीत समावेश करण्यात आला आहे.

* * * * * *